



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com




1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०३ • अंक : ११४ • पुणे • सोमवार, दि. ०५ जानेवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

कामाची भाषा बोलणारं नेतृत्व : श्री. प्रशांत मते

3



ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविणार : आबा बागुल

4

## ठळक बातम्या

### उमेदवाराच्या खात्यात फक्त २ हजार

पुणे (आरंभ पर्व) : महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय ताकदीसोबतच उमेदवारांची आर्थिक क्षमताही चर्चेचा विषय ठरली आहे. उमेदवारी अर्जासोबत सादर करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रांमधून कोट्यधीशांचे राजकारण ठळकपणे समोर आले आहे. प्रभाग क्रमांक ३७ मधील अनेक उमेदवार कोटींहून अधिक मालमत्तेसह कोट्यधीशांच्या यादीत आघाडीवर आहेत तर दुसरीकडे एक महिला उमेदवाराच्या खात्यात अवघे दोन हजार रुपये असून नावावर ना घर, ना चारचाकी ना महागडी दुचाकी आहे, या महिला उमेदवाराचे नाव आहे. तेजश्री भोसले, भोसले यांनी निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार ही माहिती समोर आली आहे. सर्वाधिक संपत्ती अरुण राजवाडे यांच्याकडे असून त्याखालोखाल गिरीराज सावंत, वर्षा तापकीर, मोहिनी देवकर, पंढरीनाथ खोपडे यांचा नंबर लागतो. या प्रभागात चार गटांत मिळून २७ उमेदवार रिंगणात आहेत, त्यामधील काही प्रमुख उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रातून कोट्यवधींची मालमत्ता उघड झाली आहे.

### उमेदवारांची संपत्ती प्रतिज्ञापत्रे गहाळ

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी हडपसर क्षेत्रीय कार्यालयात नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी सादर केलेली संपत्तीची प्रतिज्ञापत्रे नागरिकांच्या माहितीसाठी कार्यालयातील फलकावर लावण्यात येतात. मात्र ही प्रतिज्ञापत्रे गहाळ झाल्याचा प्रकार समोर आला असून, त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र याबाबत काहीच कारवाई आम्ही स्वत:हून करणार नसल्याची माहिती येथील निवडणूक अधिकाऱ्यांनी घेतली आहे.

### रविवारची पर्वणी; प्रचाराचा धुरळा

# राज्यभर नेत्यांचा झंझावात



- महानगरपालिका निवडणुकांसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पक्षाध्यक्ष मैदानात; पहिल्याच रविवारी प्रचाराला वेग

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणूक प्रचारासाठी रविवारी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, दोन्ही ठाकरे बंधू मैदानात उतरले होते. रविवारी सुट्टीचा मोका साधत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी या नेत्यांनी राज्यभरात मैदान पिंजून काढले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी विदर्भात झंझावाती प्रचार केला. यावेळी त्यांनी अमरावती येथे रोड शो केला. त्यांच्यासोबत माजी खासदार नवनीत राणा याही उपस्थित होत्या.

भाजपचे स्टार प्रचारक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिवसभर विदर्भात प्रचाराचा सपाटा लावला. एकाच दिवशी त्यांनी पाच ठिकाणी सभा घेतल्या. चंद्रपूर, अमरावती येथे रोड शो, तर अकोला क्रिकेट क्लब मैदानावर जाहीर सभा घेतली. त्यानंतर थेट मुंबई गाठत कांदिवली विभागातही दोन सभा घेतल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी विदर्भात झंझावाती प्रचार केला. यावेळी त्यांनी अमरावती येथे रोड शो केला. त्यांच्यासोबत माजी खासदार नवनीत राणा याही उपस्थित होत्या.

शिवसेना 'उबाठा'चे नेते उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईत प्रचारसभा सुरू केल्या आहेत. रविवारी या दोन नेत्यांनी आपला संयुक्त जाहीरनामा प्रकाशित केला. परंतु, अद्याप त्यांनी राज्यात दौरे सुरू केले नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे बुधवारपासून आपल्या प्रचार सभांना सुरुवात करणार आहेत, तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे रविवारी एका कार्यक्रमानिमित्त नंदुरबारला होते. ते सोमवारपासून प्रचाराच्या मैदानात उतरणार असल्याचे समजते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी विदर्भात झंझावाती प्रचार केला. यावेळी त्यांनी अमरावती येथे रोड शो केला. त्यांच्यासोबत माजी खासदार नवनीत राणा याही उपस्थित होत्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिकांच्या निवडणुका प्रतिष्ठेच्या केल्या आहेत. या दोन्ही शहरांमध्ये त्यांनी विविध माध्यमांतून मतदारांशी संपर्क साधला. तर, मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची संपूर्ण धुरा त्यांनी नवाब मलिक यांच्यावर सोपविली आहे. मलिक यांनी काही ठिकाणी प्रचार सभा घेतल्या.

### ठाकरे म्हणजे करप्शन आणि कन्फ्युजनची युती

**मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर झालेली उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती म्हणजे भीतीसंगम आहे. कन्फ्युज्ड आणि करप्ट युती आहे, एकजण कन्फ्युज्ड आहे आणि दुसरा करप्ट लोकांचा नेता आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंचा समाचार घेतला. ठाकरे बंधूंच्या वचननाम्यावर सडकून टीका करताना 25 वर्षे मुंबईकरांनी संधी दिली होती. आता यापुढे संधी मिळणार नाही याची जाणीव खुद्द ठाकरे बंधूंनाही असल्याची टीका फडणवीस यांनी केली. सात वर्षांत मुंबई झोपडपट्टी मुक्त करू आणि दोन वर्षात सर्व मेट्रो प्रकल्प जनतेच्या सेवेत आणण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. मुंबई महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी रात्री कांदिवली येथे प्रचारसभेला संबोधित केले. मुंबई भाजपाध्यक्ष अमीत साटम यांच्यासह भाजपचे आमदार, खासदार, पदाधिकारी यांच्यासह महायुतीचे उमेदवार उपस्थित होते. याप्रसंगी मुंबईच्या माजी महापौर शुभा राऊळ यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. गायक अवधुत गुप्ते आणि गायिका वैशाली सामंत यांनी भाजपच्या प्रचारगीत सादर केले.**

# वर्षांनंतर राज ठाकरे शिवसेना भवनात

- जुन्या आठवणींना दिला उजाळा
- वचननाम्याच्या निमित्ताने शिवसेना भवनात पुनरागमन
- १९७७ च्या दगडफेकीच्या घटनेचा केला उल्लेख



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मूळ शिवसेनेपासून विभक्त होऊन महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाची स्थापना करणारे राज ठाकरे यांनी रविवारी वचननामा प्रसिद्ध करण्याच्या निमित्ताने तब्बल दोन दशकांनंतर शिवसेना भवनात पाऊल ठेवले. शिवसेना भवनात येताच राज ठाकरे यांना जुन्या आठवणी दाटून आल्या.

राज ठाकरे म्हणाले, आज मी खूप वर्षांनंतर शिवसेना भवनमध्ये आलो आहे. नवीन शिवसेना भवन मी पहिल्यांदा बघत आहे. माझ्या मनात कायमच्या कोरल्या गेलेल्या आठवणी जुन्या शिवसेना भवनातील आहेत. त्यामुळे कुठे काय होतं हेच मला आता समजत नाही आहे, पण जुन्या शिवसेना भवनामधील आठवणी या खूप आनंददायी होत्या. त्या आठवणींबद्दल जर मी बोलायला बसलो तर मला पूर्वीपासूनच्या खूप गोष्टी सांगता येतील.

1977 साली शिवसेना भवन झाले आणि त्याच वर्षी जनता पक्षाचे सरकार आले होते. त्यावेळी त्यांची सभा झाल्यानंतर शिवसेना भवनावर दगडफेक झाली होती. त्याला उत्तर देताना शिवसैनिकांनी ट्यूबलाईट काढून फेकल्या होत्या. तेव्हापासूनच्या सगळ्या जुन्या आठवणी आहेत. पण आता त्या आठवणींमध्ये आज रमत नाही, असेही राज ठाकरे म्हणाले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला संजय राऊत यांनी, राज ठाकरे हे 20 वर्षांनी शिवसेना भवनात आल्याचा उल्लेख केला. यावर राज ठाकरे यांनी मिश्कील टिप्पणी केली. संजय राऊत यांनी मी 20 वर्षांनी आल्याचा उल्लेख केला. ते ऐकून मला मी 20 वर्षांनी जेलमधून सुटून आल्यासारखे वाटत आहे, असे राज ठाकरे म्हणताच पत्रकारांमध्ये एकच हशा पिकला.

### माघारीसाठी मनसे उमेदवारांना ५ कोटींची ऑफर

**सत्ताधारी पक्षांनी पोलीस यंत्रणेचा गैरवापर, पैशाचे आमिष आणि निवडणूक अधिकाऱ्यांना हाताशी धरून सहा नगरसेवकांना बिनविरोध केल्याचा गंभीर आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. तसेच अर्ज माघारीच्या दिवशी एक पोलीस अधिकारी ठाकरे गटाच्या विक्रांत घाग या उमेदवाराला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंगल्यावर नेत असल्याचे चित्रिकरण मनसे नेते अविनाश जाधव आणि शिवसेनेचे माजी खासदार राजन विचारे यांनी पत्रकार परिषेदेत सादर करीत लोकशाहीचा खून करणाऱ्या निवडणूक अधिकारी वृषाली पाटील आणि सत्वशीला शिंदे यांचे फोन कॉल, सीसीटीव्ही फुटेज, बँक अकाउंट तपासावे आणि त्यांच्या जागी नवीन निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी केली. उद्यापर्यंत त्या अधिकाऱ्यांबाबत निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा महाविकास आघाडीने निवडणूक आयोगाला दिला आहे. ठाणे महापालिकेत उमेदवारांचे जाणूनबुजून अर्ज बाद करून उबाठा, मनसे आणि अपक्ष उमेदवारांना अर्ज मागे घेऊन सात जणांना बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करण्यात आले. हा प्रकार सत्ताधाऱ्यांनी सत्तेचा गैरवापर, पोलीस यंत्रणेचा वापर, धमकावणे, गुन्हे दाखल करण्याची धमकी देणे निवडणूक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून घडवून आणला आहे, त्याची चौकशी करण्याची मागणी विचारे आणि जाधव यांनी केली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी मनसेच्या उमेदवाराला पाच कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली होती. एवढे पैसे कुठून आले याचा तपास करण्याची मागणी अविनाश जाधव यांनी करीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले. ठाणे महापालिका निवडणुकीत मनसेसह विरोधी पक्षातील उमेदवारांना सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून कपटनितीने अर्ज बाद करीत, पैशांचे आमिष दाखवून शिंदे सेनेचे ६ उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यात आले. या संदर्भातील अधिक माहिती देताना, राजन विचारे म्हणाले, या निवडणुकीत राज्यभरात ३३६ अर्ज अधिकाऱ्यांनी बाद केले असून तब्बल ६८ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. बंगल्यावर बोलावुन आमिष देत शिंदेचे साथीदार बिनविरोध निवडण्याचे अर्धेअधिक काम निवडणूक अधिकाऱ्यांनी केले. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी वृषाली पाटील आणि सत्वशिला शिंदे यांच्या मोबाईलची तपासणी व्हायला हवी.**

# उमेदवारीत नातलगांचं चांगभलं

## कार्यकर्त्यांचं काय चुकलं? निवडणुकीत सग्यासोयऱ्यांचे राजकारण

- खासदार, आजी-माजी आमदार, महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, माजी पदाधिकाऱ्यांच्या घरातच वाटली तिकिटे; सर्वच पक्षांतील चित्र



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. मात्र सर्वच पक्षांनी खासदार, आमदार, महापौर, माजी पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना उमेदवारी दिली आहे. 'उमेदवारीत नातलगांचं चांगभलं; कार्यकर्त्यांचं काय चुकलं?' असा सवाल कार्यकर्तेच करत आहेत.

पिंपरी-चिंचवडच्या राजकारणावर स्थानिक नेत्यांचे वर्चस्व आहे. महापालिका निवडणुकीत नेत्यांच्या नातलगांनाच उमेदवारी मिळत असल्याचा इतिहास आहे. भाजप, दोन्ही राष्ट्रवादी, शिंदेसेना, उद्धवसेना, मनसे, काँग्रेस अशा सर्व पक्षांनी उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र, खासदार, आमदार, महापौर, स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्षनेते, सत्तारूढ पक्षनेता, नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांच्या मुलांना, पत्नी, नातलगांचा त्यात भरणा आहे. आम्ही फक्त सतरंज्या उचलायच्या का, असा सवाल कार्यकर्ते करत आहेत.

- प्रभाग १ : मागीलवेळी सुरेश म्हेत्रे यांच्या सूनबाई स्विनल म्हेत्रे, तर आता स्वत:. दिवंगत माजी विरोधी पक्षनेते दत्ता साने यांचा मुलगा यश साने.
- प्रभाग २ : माजी नगरसेवक बबन बोराटे यांचे पुतणे वसंत, माजी महापौर शरद बोऱ्हाडे यांचे पुतणे निखिल.
- प्रभाग ४ : माजी नगरसेवक रामचंद्र गायकवाड यांचे पुत्र उदय गायकवाड.
- प्रभाग ७ : माजी आमदार विलास लांडे यांचे पुतणे विराज लांडे, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे यांचे पुत्र नितीन लांडगे.
- प्रभाग ८ : माजी नगरसेवक संजय वाबळे यांची पत्नी अश्विनी वाबळे.
- प्रभाग ९ : आमदार अण्णा बनसोडे यांचे पुत्र सिद्धार्थ बनसोडे, माजी विरोधी पक्षनेते कैलास कदम यांचे बंधू सद्गुरू कदम, माजी महापौर हनुमंतराव भोसले यांचे पुत्र राहुल भोसले, माजी नगरसेवक समीर मासुळकर यांची पत्नी शीतल मासुळकर.
- प्रभाग १० : माजी महापौर मंगला कदम व माजी महापौर अशोक कदम यांचे पुत्र कुशाग्र कदम. आमदार अमित गोरखे यांच्या मातोश्री अनुराधा गोरखे.
- प्रभाग १२ : माजी शिक्षण मंडळ सभापती धनंजय भालेकर यांच्या पत्नी सीमा भालेकर.
- प्रभाग १३ : माजी नगरसेविका कमल घोलप यांचे पती अनिल घोलप.
- प्रभाग १६ : नगरसेवक मोरेश्वर भोंडवे आणि पत्नी जयश्री भोंडवे.
- प्रभाग १७ : दिवंगत विरोधी पक्षेनेते तानाजी वाल्हेकर यांच्या पत्नी शोभा वाल्हेकर. माजी सत्तारूढ पक्षनेते श्याम वाल्हेकर यांचे भाचे सचिन चिंचवडे.
- प्रभाग १८ : माजी नगरसेवक मधुकर चिंचवडे यांचे पुत्र सागर चिंचवडे.
- प्रभाग २० : माजी विरोधी पक्षनेते शाम लांडे यांच्या पत्नी मनीषा लांडे.
- प्रभाग २१ : माजी महापौर संजोग वाघेरे यांच्या पत्नी उषा वाघेरे.
- प्रभाग २४ : खासदार श्रीरंग बारणे यांचे पुत्र विश्वजित बारणे आणि पुतणे नीलेश बारणे. माजी उपमहापौर झामा बारणे यांचे पुत्र सिद्धेश्वर, माजी विरोधी पक्षनेते संतोष बारणे यांच्या पत्नी माया बारणे, तर शिवसेनेचे माजी शहरप्रमुख सचिन भोसले यांची पत्नी वर्षा भोसले.
- प्रभाग २५ : दिवंगत माजी नगरसेवक तानाजी कलाटे यांचे पुत्र राहुल कलाटे, पुतणे मयूर कलाटे.
- प्रभाग २८ : राष्ट्रवादीचे नेते नाना काटे आणि पत्नी शीतल काटे.
- प्रभाग ३२ : दिवंगत माजी महापौर नानासाहेब शितोळे यांचे पुत्र अतुल शितोळे.




# प्रचारसभा जोरात; राजकीय रणधुमाळीला उधाण

निवडणूक जाहीर होताच शहर–उपनगरांपासून ते गल्लीबोळांपर्यंत राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रत्येक प्रभागात प्रचारसभांचा धडाका सुरू असून, वातावरण अक्षरशः निवडणुकीच्या रंगात रंगून गेलं आहे. ढोल-ताशांचा गजर, झेंडे-बॅनरांनी सजलेले चौक, कार्यकर्त्यांच्या घोषणांनी दुमदुमलेले रस्ते आणि व्यासपीठावरून होणारी आक्रमक भाषणं या सगळ्यामुळे प्रचारसभा हा केवळ राजकीय कार्यक्रम न राहता, लोकशाहीचा उत्सव ठरत आहे.

**सभांमधून शक्तिप्रदर्शन आणि आत्मविश्वास**

सध्या प्रत्येक प्रचारसभा म्हणजे संबंधित पक्षाचं शक्तिप्रदर्शन असल्याचं चित्र आहे. उमेदवारांसह पक्षाचे पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती हेच सभेचं यश मानलं जात आहे. 'लोक आमच्या पाठीशी आहेत' हा संदेश देण्यासाठी सभेतील गर्दी, घोषणा आणि प्रतिसाद याकडे विशेष लक्ष दिलं जात आहे. काही ठिकाणी सभा इतक्या मोठ्या प्रमाणावर होत आहेत की, रस्त्यांवरून वाहतूक वळवावी लागत आहे.

**विकासाचा अजेंडा विरुद्ध आरोप–प्रत्यारोप**

प्रचारसभांमध्ये विकासकामांचा लेखाजोखा हा प्रमुख मुद्दा ठरत आहे. रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठ्याची समस्या, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सेवा, शाळा आणि अंगणवाड्यांची अवस्था या सर्व प्रश्नांवर उमेदवार थेट भाष्य करत आहेत. "पाच वर्षांत काय केलं?" हा प्रश्न विचारत सत्ताधारी बाजू आपली कामगिरी मांडत आहे, तर विरोधक अपूर्ण कामं, रखडलेले प्रकल्प आणि प्रशासनातील त्रुटी यावर बोट ठेवत आहेत. त्यामुळे प्रत्येक सभा ही जणू आरोप-प्रत्यारोपांची रणधुमाळी ठरत आहे.

**कार्यकर्ते प्रचाराचे खरे शिलेदार**

प्रचारसभांच्या यशामागे कार्यकर्त्यांची मेहनत निर्णायक ठरत आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत घराघरांत प्रचार, कोपरा सभा, पदयात्रा, वाहन रॅली आणि सोशल मीडियावरील प्रचार या सगळ्यांचा परिणाम थेट सभांमध्ये दिसून येतो. कार्यकर्ते केवळ घोषणाबाजीपुरते मर्यादित न राहता, मतदारांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि भावना उमेदवारांपर्यंत पोहोचवत आहेत.

**तरुणाई आणि महिलांचा वाढता सहभाग**

यंदाच्या प्रचारसभांमध्ये तरुणाईचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरत आहे. रोजगार, शिक्षण, स्टार्टअप, क्रीडा सुविधा यांसारख्या मुद्द्यांवर तरुण प्रश्न विचारताना दिसत आहेत. त्याचबरोबर महिलांची उपस्थितीही मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. महिला सुरक्षेपासून आरोग्य, बचतगट, स्वावलंबन आणि सामाजिक योजनांपर्यंत विविध विषयांवर सभांमध्ये चर्चा होत आहे.



त्यामुळे प्रचारसभा केवळ भाषणापुरती न राहता, लोकांच्या प्रश्नांचा मंच बनत चालली आहे.

**भावनिक आवाहनांचा प्रभाव**

अनेक सभांमध्ये भावनिक मुद्द्यांनाही स्थान दिलं जात आहे. स्थानिक प्रश्न, प्रभागाची ओळख, सामाजिक सलोखा, संस्कृती आणि परंपरा यांचा उल्लेख करून मतदारांच्या भावनांना हात घालण्याचा प्रयत्न होत आहे. काही वेळा जुन्या आठवणी, संघर्षाच्या कथा आणि व्यक्तिगत अनुभव सांगत उमेदवार मतदारांशी भावनिक नातं जोडताना दिसतात. याचा सभेतील वातावरणावर मोठा प्रभाव पडतो.

**शेवटच्या टप्प्यात प्रचाराला कमाल वेग**

मतदानाची तारीख जवळ येत असताना प्रचारसभांची संख्या आणि तीव्रता दोन्ही वाढत चालली आहेत. दिवसाला अनेक सभा, रात्री उशिरापर्यंत कार्यक्रम आणि सततचा संपर्क यामुळे उमेदवारांसह कार्यकर्त्यांची दमछाक होत असली, तरी उत्साह मात्र तसूभरही कमी झालेला नाही. प्रत्येक मत महत्त्वाचं असल्याने शेवटच्या क्षणापर्यंत प्रचाराचा जोर कायम आहे.

**मतदारांच्या मनाचा कौल कुणाच्या बाजूने?**

एकूणच, "प्रचारसभा जोरात" हे सध्याचं वास्तव असून, या सभांमधून उमेदवारांचा आत्मविश्वास आणि मतदारांचा उत्साह स्पष्टपणे दिसून येतो. मात्र अंतिम निर्णय हा मतदार मतदानाच्या दिवशी घेणार आहे. प्रचारसभांचा हा गदारोळ मतपेटीत कितपत उतरतो, आणि लोकशाहीच्या या उत्सवाचा निकाल कुणाच्या बाजूने लागतो याकडे आता सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.

# साहेबराव बुट्टे पाटील यांच्यामुळे शिक्षणक्रांती - ह. भ. प. प्राजक्ता झेंडे

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

माजी आमदार व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टेपाटील यांच्यामुळे ५० वर्षांपूर्वी खेड तालुक्यात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या रूपाने शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि ज्ञानगंगा तालुक्याच्या खेडोपाडी पोचली. त्यामुळे साहेबराव बुट्टेपाटील हे खेड तालुक्यातील शिक्षणक्रांतीचे जनक असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. प्राजक्ता झेंडे यांनी केले. त्या



साहेबराव बुट्टेपाटील यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, सुरेश टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी. दौंडकर, प्रबंधक नारायण शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ह.भ.प. प्राजक्ता झेंडे यांनी बोलताना साहेबराव बुट्टेपाटील यांच्या जीवन कर्तृत्वाला उजाळा दिला. त्यांचे व्यक्तिमत्त्व संवेदनशील, समाजशील व त्यागी होते. राजकारणात संधी असतानाही त्यांनी राजकीय पद व प्रतिष्ठेचा त्याग केला. शिक्षणासारख्या आवडीच्या क्षेत्रात काम करत राहिले. त्यांचे कार्य त्यांचे सुपूत्र देवेंद्र बुट्टे पाटील तितक्याच निष्ठेने पुढे घेऊन जात असल्याचे त्या म्हणाल्या.

या प्रसंगी कु. तनिष्का शेलार, कु. साक्षी शिवेकर या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने क्रीडाज्योत, एनसीसी पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, हस्ताक्षर स्पर्धा, भारतीय संविधान जागृती प्रश्नमंजुषा, सरस्वती पूत्र या भीत्तिपत्रकाचे अनावरण आदी उपक्रम तर साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या वतीने फर्मेंटोपिया, अन्नधान्य प्रदर्शन व रक्तगट आणि रक्तदाब तपासणी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ९१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरूण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अक्षय पाटील, डॉ. पायल मुळे, डॉ. अंजली कनावर सहभागी झाले. याप्रसंगी वसुंधरा संवर्धनाची शपथ घेण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले.



## पुरस्कार सोहळ्यात श्री. रविंद्र कृष्णचंद्र ठाकूर प्रमुख पाहुणे

**नागपूर (दै. आरंभ पर्व)**

नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात देशभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात श्री. रविंद्र कृष्णचंद्र ठाकूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सोहळ्यात कला, क्रीडा, विज्ञान, शिक्षण व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या प्रतिभावान व्यक्तींना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. समाजहित व राष्ट्रनिर्मितीसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरवून त्यांना प्रेरणा देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमास छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज व नागपूरचे महाराज महाराजा मुधोजीराजे भोसले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्री. फुलारी, उत्तर प्रदेश सरकारचे सांस्कृतिक व कला मंत्री श्री. निकोसे, आंतरराष्ट्रीय लेखक श्री. क्रांती महाजन, तसेच वीर तानाजी मालुसरे यांचे थेट वंशज श्री. कुणाल मालुसरे यांची विशेष उपस्थिती लाभली.

प्रमुख पाहुणे श्री. रविंद्र कृष्णचंद्र ठाकूर यांनी आपल्या भाषणात देशाच्या विकासात कला, क्रीडा, शिक्षण, विज्ञान व सामाजिक क्षेत्रातील योगदान महत्त्वाचे असल्याचे नमूद करत, अशा पुरस्कार सोहळ्यांमुळे समाजाला योग्य दिशा व नवी प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त केले.

# भाजपच्या प्रचाराचा भव्य शुभारंभ

## धायरी–नऱ्हे–वडगावमध्ये जोरदार रॅली



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३४ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराचा भव्य आणि उत्साहपूर्ण शुभारंभ करण्यात आला. भाजपचे उमेदवार राजाभाऊ लायगुडे, हरिदास चरवड, जयश्री भूमकर आणि कोमल नवले यांच्या प्रचाराची औपचारिक सुरुवात धायरी येथील श्री काळभैरवनाथ मंदिरात नारळ फोडून करण्यात आली.

या प्रचार शुभारंभाचा कार्यक्रम खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी बोलताना आमदार तापकीर यांनी, "प्रभाग क्रमांक ३४ मध्ये भाजपचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील. केंद्र व राज्यातील भाजप सरकारच्या विकासकामांवर जनतेचा ठाम विश्वास आहे," असा विश्वास व्यक्त केला. या प्रसंगी भाजपचे मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, तसेच सागर भूमकर, गंगाधर भडावळे, सारंग नवले ,यांच्यासह विविध मान्यवर, पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत प्रचाराची दिशा ठरवली आणि निवडणुकीत विजयासाठी ताकदीने काम करण्याचा संकल्प केला.

प्रचार शुभारंभानंतर धायरी, नऱ्हे आणि वडगाव परिसरातून भव्य रॅली काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात, भाजपच्या घोषणा देत ही रॅली मार्गस्थ झाली.

या रॅलीदरम्यान भाजपच्या विकासाभिमुख धोरणांचा, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा आणि प्रभागातील स्थानिक प्रश्नांवर करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेत मतदारांशी थेट संवाद साधण्यात आला. पाणीपुरवठा, रस्ते, वाहतूक, स्वच्छता, उद्याने आणि मूलभूत नागरी सुविधांवर आगामी काळात विशेष भर दिला जाईल, असा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला.

# प्रभाग ३४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व उमेदवार विजयी होणार

**रूपाली चाकणकर यांचा विश्वास**

**बापू पोकळे , नेहा मोरे, तृप्ती पोकळे, शरद दबडे यांच्या प्रचाराचा उत्साहात शुभारंभ**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३४ (धायरी–नऱ्हे–वडगाव) येथील जनतेच्या भावना लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेसचे चारही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा ठाम विश्वास राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी व्यक्त केला.

प्रभाग क्रमांक ३४ मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बापूसाहेब पोकळे, नेहा भूपेंद्र मोरे, तृप्ती प्रतिक पोकळे आणि शरद दबडे यांच्या प्रचारार्थ भव्य मोटार रॅली आयोजन करण्यात आले होते.

या प्रचाराचा शुभारंभ धायरी येथील काळभैरवनाथ मंदिरात नारळ फोडून करण्यात आला. यावेळी बोलताना चाकणकर म्हणाल्या की, अजित पवार यांच्या



नेतृत्वाखाली राज्यात झालेला विकास आणि या प्रभागाची सद्यस्थिती पाहता युवकांना संधी देण्याचा निर्णय पक्षाने घेतला आहे.

"या सर्व उमेदवारांनी आपल्या-आपल्या भागात केलेली विकासकामे हीच त्यांची खरी ओळख आहे. जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करत ते जनसेवेसाठी सक्रिय राहिले आहेत," असे त्यांनी नमूद केले.

परिसरातील पाणी, रस्ते, वाहतूक, मूलभूत सुविधा आदी तीव्र समस्या लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेस हा भक्कम आणि विश्वासार्ह पर्याय नागरिकांना उपलब्ध झाला असून, प्रभागात परिवर्तनाची लाट निर्माण झाल्याचेही त्या म्हणाल्या.

यावेळी मुळशीचे आमदार शंकर मांडेकर यांनीही उपस्थितांना संबोधित करत, "प्रभागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रभाग ३४ मधील सर्व युवा उमेदवारांना विजयी करा," असे आवाहन केले.

प्रभागाच्या विकासासाठी प्रामाणिक परिश्रम घेण्याचा निर्धार सर्व उमेदवारांनी व्यक्त केला. कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा स्वाती पोकळे, अक्रूरशेठ कुदळे, माजी उपसभापती प्रभावती भूमकर, भूपेंद्र मोरे, कुणालदादा पोकळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अत्यंत उत्साहात पार पडलेल्या या प्रचार शुभारंभामुळे प्रभागात चुरस वाढली असून, हा उत्साह निश्चितच दिशादर्शक ठरला आहे.

त्यामुळे आगामी काळामध्ये या प्रभागातील प्रचार कसा होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे..

भारतीय जनता पार्टीच विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार व इतर सर्व पक्षाचे उमेदवार यांच्यामध्ये चौरंगी सामना होणार आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## रमेश थोरात व विरधवल जगदाळे यांच्याकडून बांधकामाची पाहणी

**दौंड (आरंभ पर्व) :** पुणे जिल्ह्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी राबविलेल्या मॉडेल स्कूल या उपक्रमाचे अतिशय चांगल्या प्रकारे काम सुरू आहे.स्वामी चिंचोली येथील सुरू असलेल्या मॉडेल स्कूल कामाचे माजी आमदार रमेश थोरात, माजी जिल्हा परिषद सदस्य वीरधवल बाबा जगदाळे, माजी पंचायत समिती सभापती प्रकाश नवले,केशव माधव पतसंस्थेचे संचालक मच्छिंद्र मदने,माजी सरपंच गजानन गुनवरे,विजय काळे,चेअरमन पोपट मिंढे,रामराजे शिंदे,सर्जेराव मिंढे आदी मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.याचबरोबर सुरू असलेल्या विविध विकास कामाची पाहणी केली.गावामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक गाळ्यांचे यावेळी उद्घाटन करण्यात आले.त्याचबरोबर गावामध्ये विविध ठिकाणी भेट दिली.

## वाकळवाडी परिसरातून शाळकरी मुलगी बेपत्ता



**राजगुरुनगर (आरंभ पर्व) :** खेड तालुक्याच्या पुर्व भागातील वाकळवाडी, ठाकरवाडी परिसरातून शाळकरी मुलगी बेपत्ता झाल्याची घटना घडली. इयत्ता ८ वी मध्ये शिक्षण घेत असलेली वंदना वसंत इंगळे असे बेपत्ता झालेल्या विद्यार्थीनीचे नाव आहे. याप्रकरणी खेड पोलीसांत तक्रार देण्यात आली असून पोलीस तीचा शोध घेत आहेत. रंगाने गहुवर्ण, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, उंची सुमारे ५ फूट, नाक सरळ, केस लांब आहे. तीने हिरव्या रंगाची साडी व हिरव्या रंगाचा ब्लाऊज परिधान केलेली असून मराठी भाषा बोलते. अशा वर्णनाची मुलगी आहे. या मुलीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास किंवा ती कुठे आढळून आल्यास तात्काळ खेड पोलीस स्टेशन दूरध्वनी क्रमांक ०२१३५-२२२०३३ वर संपर्क साधावा, असे आवाहन खेड पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## एकपात्री, लाठीकाठी व दांडपट्टा प्रात्यक्षिकांनी जिंकली मने



**पुणे (आरंभ पर्व) :** सावित्रीबाई फुले, महात्मा फुले यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनावरील एकपात्री नाट्यछटा, लाठीकाठी व दांडपट्टा प्रात्यक्षिके पाहून उपस्थित भारावून गेले. विद्यार्थी व महिलांच्या या सादरीकरणाने दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलमधील उपस्थितांची मने जिंकली. नवी पेठ येथील एस. एम. जोशी सभागृहात भिडेवाडाकार फुलेप्रेमी कवी, संविधानदूत विजय वडवेराव यांच्या संकल्पनेतून देशातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियानांतर्गत दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलचे आयोजन केले आहे. महाराष्ट्रासह देशविदेशातून ८०० कवी, साहित्यिक, विचारवंत, कलाकार यामध्ये सहभागी झाले आहेत.



## नवनाथ जी थोरे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार

**शिर्डी (आरंभ पर्व) :** शिर्डी साई पालखी सोहळ्याचे चोपदार व साई संस्थान एम्पलॉइज सोसायटी कर्मचारी नवनाथ जी थोरे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला सत्कार करताना नानासाहेब थेटे किसनराव निकम राहुल डांगे नवनाथ डांगे मंगेश कुलकर्णी संतोष डांगे दीपक जानी व पत्रकार संजय महाजन आदी कर्मचारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.






दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

सोमवार, दि. ०५ जानेवारी २०२६














## ‘तुतारी’च वाजणार

### काकासाहेब चव्हाण यांचा ठाम विश्वास



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३३ मध्ये सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, निष्क्रिय प्रशासनाविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा ‘तुतारी वाजवणारा माणूस’ हे निवडणूक चिन्ह असलेला संपूर्ण पॅनल मोठ्या मताधिक्याने विजयी होईल, असा ठाम विश्वास उमेदवार काकासाहेब चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

प्रभाग क्रमांक ३३ खडकवासला–शिवनेरी भागातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ शिवणे येथील भैरवनाथ मंदिरात नारळ फोडून करण्यात आला. या प्रसंगी उमेदवारांच्या समर्थनार्थ भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे उमेदवार काकासाहेब चव्हाण, संदीप मते, अनिता इंगळे आणि

- **राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचचा शिवणेत प्रचाराचा शुभारंभ**

रश्मी घुले सहभागी झाले होते.

शिवणे उत्तम नगर येथून सुरू झालेली ही रॅली खडकवासला मार्गे धायरी येथे समारोपास आली. रॅलीदरम्यान ‘तुतारी’च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मित्र पक्षांचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समाविष्ट गावांचा विकास करताना पाणी, रस्ते, वीज, ड्रेनेज यांसारख्या मूलभूत सुविधांसोबतच शहरातील नागरी सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्याचा आमचा ठाम निर्धार असल्याचे सर्व उमेदवारांनी सांगितले. प्रभाग क्रमांक ३३ मध्ये काढण्यात आलेल्या या भव्य रॅलीमुळे निवडणूक वातावरण निश्चितच बदलल्याचे चित्र दिसून आले.

“या प्रभागातून तुतारीचाच चार नगरसेवकांचा पॅनल निवडून येईल,” असा विश्वास यावेळी सर्व उमेदवारांनी व्यक्त केला.

## कामाची भाषा बोलणारं नेतृत्व

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**



**मिशन महानगरपालिका**

**प्रभाग क्र. २४ – शिवसेना (एकनाथ शिंदे गट)**



**(दै. आरंभ पर्व)**

काही माणसं स्वतःबद्दल फारसं बोलत नाहीत; पण त्यांचं कामच त्यांची ओळख बनतं. प्रभाग क्र. २४ मध्ये असंच एक नाव म्हणजे प्रशांत मते. गाजावाजा, दिखाऊपणा किंवा केवळ भाषणांची राजकारणं यापेक्षा “काम झालं पाहिजे” या ठाम भूमिकेतून त्यांनी स्वतःचं नेतृत्व घडवलं आहे. त्यामुळेच त्यांचा प्रवास हा केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून, लोकांच्या रोजच्या आयुष्याशी जोडलेला आहे.

**पदाआधी जबाबदारीची जाणीव :** प्रशांत मते यांच्यासाठी राजकारण म्हणजे अधिकार नव्हे, तर जबाबदारी. प्रभागातील नागरिकांच्या समस्या ऐकून घेणं, त्या छोट्या असोत वा मोठ्या त्यावर उपाय शोधणं, आणि तो उपाय प्रत्यक्षात उतरवणं, हा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळेच अनेकदा लोक “नेता म्हणून नव्हे, तर आपला माणूस म्हणून” त्यांच्याकडे पाहतात.

**विकासाचा गोंगाट नाही, ठोस परिणाम :** रस्ते, पाणी, ड्रेनेज, स्वच्छता, वीज, आरोग्य सुविधा या सगळ्या गोष्टी केवळ निवडणूक जाहीरनाम्यात न राहता जमिनीवर दिसाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. कुठे अडथळे असतील, तर ते प्रशासनाशी समन्वय साधून दूर करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. “उद्या पाहू” पेक्षा “आज काय करता येईल” हा त्यांचा दृष्टिकोन प्रभागाला पुढे नेणारा ठरला आहे.

**सर्वसामान्यांचा विश्वास म्हणजे खरी शिदोरी :** प्रशांत मते यांची खरी ताकद म्हणजे लोकांचा विश्वास. एखाद्या नागरिकाचं काम अडलं असेल, कुणाला शासकीय कागदपत्रांची अडचण असेल, कुणावर अचानक संकट आलं असेल अशा वेळी ते केवळ आश्वासन देत नाहीत, तर प्रत्यक्ष सोबत उभे राहतात. हीच माणुसकी त्यांना वेगळं स्थान देऊन जाते.

**शिवसेनेच्या विचारांची चालती-बोलती प्रतिमा :** शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांची भूमिका तळागाळातील माणसासाठी काम करणं, विकासाला प्राधान्य देणं आणि निर्णयक्षम नेतृत्व उभं करणं ही मूल्ये प्रशांत मते यांच्या कामातून स्पष्टपणे दिसतात. विचारांशी निष्ठा आणि कृतीत ठामपणा, हा संगम त्यांच्या नेतृत्वाची ओळख आहे.

**तरुण, महिला आणि ज्येष्ठ सगळ्यांसाठी समान बांधिलकी :** तरुणांसाठी संधी, महिलांसाठी सुरक्षितता व सन्मान, ज्येष्ठांसाठी आधार या तिन्ही घटकांकडे ते समतोल नजरेने पाहतात. विकास हा केवळ इमारतींचा नसून माणसांचा असतो, ही त्यांची ठाम धारणा आहे. त्यामुळेच त्यांचा विकासदृष्टिकोन सर्वसमावेशक आहे.

**उद्याच्या प्रभागाचं स्वप्न :** स्वच्छ, सुरक्षित, सुसज्ज आणि अभिमान वाटावा असा प्रभाग क्र. २४ हे त्यांचं स्वप्न आहे. केवळ आजच्या गरजा भागवणं नव्हे, तर पुढच्या पिढीसाठी मजबूत पाया घालणं, हा त्यांचा ध्यास आहे.

प्रशांत मते हे मोठमोठ्या दाव्यांमुळे नव्हे, तर शांतपणे केलेल्या कामामुळे लक्षात राहतात. राजकारणात जिथे शब्दांची चलती जास्त आहे, तिथे त्यांनी कामाची भाषा निवडली आहे. म्हणूनच प्रभाग क्र. २४ मध्ये त्यांचं नाव म्हणजे आश्वासन नाही तर विश्वासाची खात्री आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पांढरेवाडीत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील ग्रामपंचायत पांढरेवाडीच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी सरपंच सौ.निता राजेंद्र कोंडे ,सदस्या सौ. विदुलता निंबाळकर श्री. अनिल झगडे,ग्रामपंचायत अधिकारी स्वाती लोंढे, श्री. धनसिंग जाधव, सौ. स्वाती शितोळे, सौ. संगिता शेंडगे उपस्थित होते.यावेळी बोलताना सरपंच नीता कोंडे म्हणाल्या की,सावित्रीमाई प्रमाणे प्रत्येक महिलेने खंबीर निर्धार केला तर समाजात अन्यायाला जागाच उरणार नाही,सावित्रीमाईची प्रेरणा घेऊन जीवन जगावे. आभार स्वाती शितोळे यांनी मानले.

### आज मराठी कलाकार भाऊ कदम दौंड तालुक्यातील गलांडवाडीमध्ये



दौंड (आरंभ पर्व) : मराठी सिने अभिनेते भाऊ कदम हे दौंड तालुक्यातील गलांडवाडी या ठिकाणी 5 जानेवारी 2026 रोजी दुपारी 12 वाजता येणार असून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सक्षम पणे राबवण्यासाठी येणार आहेत, सिने अभिनेते भाऊ कदम यांच्या हस्ते वृक्षरोपण, सांडपाणी कामाचे भूमिपूजन, खुली व्यायाम शाळा व सूर्यघर सोलरचे उद्घाटन, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, त्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पर व्याख्यान देणार आहेत या कार्यक्रमाचा सर्व ग्रामस्थांनी लाभ घ्यावा असे आव्हान दौंड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अरुण मरभळ यांनी केले आहे.

### थंड सकाळ : हिवाळ्यात काळजी घेण्याचे डॉक्टरांचे आवाहन

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील ग्रामीण व निमशहरी भागात हिवाळा सुरू होत असताना, मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील तज्ज्ञ डॉक्टरांनी विशेषतः पहाटेच्या वेळेत उद्भवणाऱ्या शांत पण गंभीर आरोग्य आपत्कालीन परिस्थितींबाबत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. हृदयतज्ज्ञ डॉ. सूरज पाटील यांनी सांगितले की, थंड तापमानामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, ज्यामुळे रक्तदाबात अचानक वाढ होण्याचा धोका निर्माण होतो. क्लिनिकल निरीक्षणानुसार, हिवाळ्यात महाराष्ट्रातील ग्रामीण आणि निमशहरी भागात हृदयविकार व मेंदूविकार (स्ट्रोक) रुग्णसंख्येत सुमारे 25 ते 30 टक्क्यांनी वाढ दिसून येते. सामान्य वैद्यांच्या मते, ग्रामीण भागातील सुमारे 60 टक्के हृदयविकाराच्या रुग्णांकडून सुरुवातीची लक्षणे दुर्लक्षित केली जातात. ही लक्षणे थंडीमुळे आलेली थकवा किंवा पोटाच्या (गॅस्ट्रिक) त्रासाशी जोडली जात असल्याचे आढळते.

## दिव्यांग महिला क्रिकेट संघाची संघ व्यवस्थापक बनून उमंग कप जिंकला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दिव्यांग बहिणीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सुरू झालेला प्रवास थेट राष्ट्रीय विजेतेपदापर्यंत पोहोचला. दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्ड ऑफ इंडिया (DCCBI) व उमंग गौरवदीप वेलफेअर सोसायटी, भोपाळ (म.प्र.) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय उमंग कप–२०२५ स्पर्धेत मुंबई (महाराष्ट्र) दिव्यांग महिला क्रिकेट संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले.

दि. ८ ते ११ डिसेंबर दरम्यान भोपाळ येथे झालेल्या या स्पर्धेत झारखंड, राजस्थान, मध्यप्रदेश व मुंबई (महाराष्ट्र) या संघांनी सहभाग घेतला होता. मुंबई संघाने साखळी



सामन्यांत राजस्थान व मध्यप्रदेश संघांचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात झारखंड संघावर मात करत मुंबई संघाने उमंग कप–२०२५ची ट्रॉफी उंचावली.

या ऐतिहासिक यशात संघातील सर्व दिव्यांग महिला खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. मात्र या विजयामागे विशेष मोलाचा वाटा लाभला तो संघ व्यवस्थापक रसिका शिंदे (जगताप) यांचा. संघाचे व्यवस्थापन, खेळाडूंचे मार्गदर्शन, रणनीती आखणे आणि मानसिक बळ देणे या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी उत्कृष्टपणे पार पाडल्या.

या यशोगाथेचे आणखी एक भावनिक पैलू म्हणजे या विजयी संघात सख्या बहिणींची जोडी.

तन्वी शिंदे (पुणे) या संघातील यष्टिरक्षक खेळाडू तर त्यांची बहीण रसिका शिंदे संघ व्यवस्थापक. लहानपणापासून क्रिकेटची आवड असलेल्या दिव्यांग तन्वीच्या स्वप्नाला आकार देण्यासाठी रसिकाने स्वतः क्रिकेटचे तांत्रिक ज्ञान नसतानाही हार मानली नाही.

युट्युब व विविध माध्यमांतून माहिती मिळवत तिने बहिणीला सराव करून दिला.






# मा. प्रशांत मते यांचा प्रचार जोरात

### जनमानसात जात नागरिकांशी आपुलकीचा संवाद : नागरिकांच्या सेवेसाठी निवडून येणारच, असा ठाम विश्वास

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेली तीन दशके जनसेवेचा वसा जपत कार्यरत असलेले शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रवी धंगेकर हे खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांच्या बळावर उभे असलेले नेतृत्व आहे. कार्यकर्ते-केंद्रित राजकारणावर ठाम विश्वास ठेवत त्यांनी प्रभाग क्रमांक २३–२४ मधून तळागाळातून सातत्याने काम करत पुढे आलेल्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देत मोठा विश्वास दाखवला आहे. याबाबत उमेदवार प्रशांत मते यांनी आपली भावना व्यक्त केली.

प्रशांत मते म्हणाले की, “मी गेली अनेक वर्षे दिवस-रात्र नागरिकांच्या सेवेत कार्यरत आहे. महानगरपालिकेशी संबंधित प्रश्न असोत, रुग्णालयातील उपचार व





आरोग्यसेवेच्या अडचणी असोत, शाळा व विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेतील अडथळे असोत प्रत्येक वेळी सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. कोणताही गाजावाजा न करता, तळागाळात राहून काम करण्याची शिकवण मला कार्यकर्त्यांनीच दिली.”

ते पुढे म्हणाले, “रवीभाऊंनी सुरुवातीपासूनच स्पष्ट भूमिका मांडली होती की, सच्च्या आणि निष्ठावान कार्यकर्त्यांनाच उमेदवारी दिली जाणार. या भूमिकेवर ठाम राहत त्यांनी माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यावर जो विश्वास दाखवला, तो माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे. उमेदवारी अर्ज भरतानाचा क्षण हा केवळ माझा नव्हे, तर माझ्यासोबत खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा विजय होता.”

दरम्यान, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर प्रशांत मते यांचा प्रचार चांगलाच वेग घेत आहे. घराघरांत जाऊन, गल्लोगल्ली फिरून ते थेट नागरिकांशी संवाद साधत असून त्यांच्या समस्या समजून घेत आहेत. “निवडणूक म्हणजे केवळ मत मागणे नव्हे, तर नागरिकांच्या प्रश्नांशी आपुलकीने जोडले जाणे,” अशी भूमिका त्यांनी मांडली.

या पार्श्वभूमीवर प्रशांत मते यांनी प्रभागातील नागरिकांना थेट आवाहन केले.

“सर्व नागरिकांनी रवीभाऊंचे हात बळकट करावेत. पॅनलच्या सर्व उमेदवारांना मतदान करून शिवसेना (एकनाथ शिंदे गट) मजबूत करावी आणि विकास, सेवा व विश्वासाचा हा प्रवास अधिक गतिमान करावा,” असे आवाहन त्यांनी केले.

तळागाळातील कार्यकर्त्याला उमेदवारी देत नेतृत्वाने दाखवलेला विश्वास, तसेच नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने झटणाऱ्या उमेदवाराची भूमिका पाहता, प्रभाग क्रमांक २३–२४ मधील ही निवडणूक चुरशीची ठरणार असून प्रशांत मते यांच्या प्रचाराला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### विमाननगर-लोहगाव प्रभाग ३ मधील भाजप उमेदवार आहेत 'कोट्यधीश'



पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असून, प्रभाग क्र. ३ (विमाननगर-लोहगाव) मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. उमेदवारांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातून त्यांच्या संपत्तीचा आकडा समोर आला असून, या प्रभागातील बहुतांश उमेदवार 'कोट्यधीश' असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामध्ये इतर उमेदवारांचा तुलनेत भाजपच्या ऐश्वर्या अतुल पाटील (बापूसाहेब पठारेंच्या सून) यांनी २७२ कोटींच्या एकूण मालमत्तेसह प्रभागात आघाडी घेतली आहे. सर्वात श्रीमंत उमेदवार ऐश्वर्या अतुल पाटील यांच्याकडे कुटुंबाची संयुक्त २१७ कोटींहून अधिकची स्थावर मालमत्ता असून एकूण २७२ कोटींच्या मालमत्तेसह त्या टॉपच्या श्रीमंत उमेदवार ठरल्या आहेत. त्यांचे वार्षिक उत्पन्न ६ लाख ५० हजार आहे तर त्यांचे पती सुरेंद्र पठारे यांचे उत्पन्न ३ कोटींच्या घरात आहे. वार्षिक उत्पन्नात श्रेयश प्रीतम खांदवे अव्वल असून त्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा विचार करता ते ५ कोटी ६८ लाख रुपये इतके असून ते इतर उमेदवारांच्या तुलनेत सर्वाधिक आहे. आर्थिक ताकद असली तरी या प्रभागात आमदार बापूसाहेब पठारे यांची सून म्हणून राजकीय प्रतिष्ठा पणाला लागल्याचे चित्र आहे. कोट्यधीश उमेदवारांच्या यादीत बंडू शहाजी खांदवे यांची मालमत्ता इतर उमेदवारांच्या तुलनेत कमी (६.३४ कोटी) असली तरी, स्थानिक जनसंपर्क आणि प्रचाराच्या जोरावर ते कशी टक्कर देतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. दुसरीकडे, अनिल सातव आणि रामदास दाभाडे यांच्यातही २१ कोटींच्या मालमत्तेसह कांटे की टक्कर पाहायला मिळत आहे. या 'धनवान' उमेदवारांपैकी लोहगाव-विमाननगरची जनता कोणाच्या पारड्यात आपले मत टाकते, हे आता निवडणुकीनंतरच स्पष्ट होईल. घोडा-मैदान जवळच आहे.




### मुंबई महानगरपालिकेत 3 लाख कोटींचा घोटाळा

मुंबई (आरंभ पर्व) : महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारांनी रंगत आणली असतानाच रविवारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबई महानगरपालिकेत 3 लाख कोटींचा घोटाळा झाल्याचा खळबळजनक आरोप करीत भाजप आणि शिंदे गटावर हल्ला चढवला. सत्ताधाऱ्यांनी पालिकेच्या कंत्राटदारांना 3 लाख कोटी ॲडव्हान्स मोबिलायझेशनमधून दिले आणि त्यातून किकबॅक घेऊन हा पैसा निवडणुकीसाठी वापरणार असल्याचा गौप्यस्फोटही केला. हा 3 लाख कोटींचा घोटाळा खोकासुरांनी केल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. उद्धव ठाकरे यांच्या आरोपामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

# पवारांचे विश्वासू मानले जाणारे दमिष्टे परिवार ठाकरेंच्या सेनेत सक्रिय

## राजकीय समीकरणांना नवी कलाटणी

- प्रभाग क्रमांक ३४ मध्ये ज्येष्ठ नेत्या सुरेखाताई दमिष्टे निवडणुकीच्या आखाड्यात!!



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील निष्ठावंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजी जिल्हा परिषद सदस्या सुरेखाताई दमिष्टे यांना अखेर राष्ट्रवादी शरद चंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी नाकारण्यात आली. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, त्यानंतर सुरेखाताई दमिष्टे आणि त्यांचे चिरंजीव निलेश दमिष्टे यांनी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) मध्ये जाहीर प्रवेश केला.

यानंतर प्रभाग क्रमांक ३४ ब मधून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडून एबी फॉर्म जोडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने दमिष्टे परिवाराचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीपासून दुरावा स्पष्ट झाल्याचे चित्र आहे.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना सुरेखाताई दमिष्टे म्हणाल्या, "आम्ही इतकी वर्षे म्हणजे राष्ट्रवादी पक्ष स्थापने पासून पक्षासाठी प्रामाणिकपणे काम केले. त्या निष्ठेची अशी पावती मिळत असेल, तर भूतकाळ,वर्तमानकाळ गेलाच पण भविष्यात निष्ठावंत कार्यकर्त्यांची किंमत नाही हे नक्की. जे झाले ते झाले; मात्र आता आम्ही उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काम करून प्रभाग ३४ मध्ये ब गटात विजयाची मशाल पेटवू."

पवार परिवाराशी दीर्घकाळ निष्ठा राखूनही उमेदवारी न मिळाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. "ही किंमत मान्य नसली, तरी या घटनेतून बोध घेऊन पुढील वाटचाल करणार आहोत," असेही त्यांनी स्पष्ट केले.

दमिष्टे परिवाराच्या या निर्णयामुळे प्रभाग ३४ मधील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## दुकान खरेदीच्या बहाण्याने महिलेची १२ लाखांची फसवणूक

- काका आणि चुलतभावानेच विश्वासाचा गैरवापर केल्याचा आरोप
- दुकानाचा ताबा न देता चार वर्षांपासून टाळाटाळ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दुकान खरेदीच्या बहाण्याने पुण्यातील एका महिलेची तब्बल 12 लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संबंधित महिलेने सांगवी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, काका आणि चुलतभावानेच विश्वासाचा गैरवापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे.नवी सांगवी परिसरात राहणाऱ्या संगीता राम कांबळे (वय 55) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा चुलत भाऊ सचिन चंद्रकांत प्रभाळे (रा. शुक्रवार पेठ, पुणे) आणि चुलते चंद्रकांत प्रभाळे (रा. गुरुवार पेठ, पुणे) यांनी दुकान विक्रीच्या व्यवहारात त्यांची आर्थिक फसवणूक केली. शुक्रवार पेठ येथील एक दुकान खरेदी करण्याचा प्रस्ताव आरोपींनी मांडला होता. सदर दुकानाची किंमत 20 लाख रुपये असल्याचे सांगत, व्यवहाराचा पहिला टप्पा म्हणून तात्काळ 12 लाख रुपये देण्याची मागणी करण्यात आली. त्यावर विश्वास ठेवून संगीता कांबळे यांनी 14 डिसेंबर 2020 रोजी सारस्वत बँक, औंध शाखा येथून चेक क्रमांक 008981 द्वारे 12 लाख रुपयांची रक्कम आरोपींना दिली. या व्यवहारावेळी आरोपी सचिन प्रभाळे यांच्यासोबत त्यांचे वडील चंद्रकांत प्रभाळे, आई चंद्रकला प्रभाळे आणि पत्नी श्रद्धा प्रभाळे उपस्थित होते व त्यांनी व्यवहाराबाबत हमी दिली होती. मात्र, तक्रारदार महिलेचा आरोप आहे की, त्यांनी दिलेली रक्कम स्वतःच्या उपयोगात आणण्यात आली. तसेच संबंधित दुकान त्यांच्या नावावर न करता, सचिन प्रभाळे यांनी ते दुकान स्वतःच्या नावावर खरेदी केले. त्यानंतर गेल्या तीन ते चार वर्षांपासून वारंवार पाठपुरावा करूनही दुकानाचा ताबा देण्यात आलेला नाही, तसेच घेतलेली रक्कमही परत करण्यात आलेली नाही.

## हडपसरमधील माजी नगरसेवकामुळे संपवलं आयुष्य



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हडपसर-सय्यदनगरमधील गुंड टिपू पठाण टोळीविरोधात मकोका कारवाई केल्यानंतर फरार झालेल्या सराईत गुन्हेगाराने लष्कर भागात आत्महत्या केल्याची घटना शनिवारी उघडकीस आली. त्याने आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत (सुसाईड नोट) हडपसरमधील एका माजी नगरसेवकासह अन्य काही जणांची नावे आढळली आहेत. माजी नगरसेवकाने फरार आरोपीकडे ५० लाख रुपये मागितले होते. आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या माजी नगरसेवकासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सादिक हुसेन कपूर (५६, रा. सय्यदनगर, हडपसर) असे आत्महत्या केलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. याप्रकरणी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे माजी नगरसेवक फारुक यासीन इनामदार, अफान फारूक इनामदार, जहूर महंमद सय्यद (तिघे रा. सय्यदनगर, हडपसर), तन्वीर इब्राहीम मनियार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. याबबात कपूर यांचा मुलगा साजिद (२७, रा. ख्वाजा मंझील, सय्यदनगर, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे, अशी माहिती लष्कर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांनी दिली. सादिक कपूर याचे लष्कर भागातील ईस्ट स्ट्रीट परिसरातील कुमार पॅलेस सोसायटीत कार्यालय आहे. कपूर जमीन खरेदी-विक्री व्यवसाय करायचा.

## ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविणार : आबा बागुल



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तळजाई टेकडी येथील सदू शिंदे क्रिकेट स्टेडियम तसेच वाळवेकर लॉन येथे आयोजित कार्यक्रमात शिवसेनेचे अधिकृत उमेदवार आबा बागुल यांनी ज्येष्ठ नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी, समस्या आणि अपेक्षा जाणून घेतल्या. या संवाद कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक ३६ सहकारनगर-पद्मावतीमधून शिवसेनेचे अधिकृत उमेदवार माजी उपमहापौर आबा बागुल आणि पॅनलच्या तीनही उमेदवारांनी तळजाई टेकडीवर सकाळी फिरावयास येणाऱ्या नागरिकांशी संवाद साधला आणि विकासासाठी "शिवसेनेचे धोरण कणखर" यावर चर्चा केली. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आबा बागुल यांच्यासह बाळासाहेब उर्फ मच्छिन्द्र ढवळे, पूनम हरीश परदेशी, नयना नितीन लगस या शिवसेनेच्या उमेदवारांना निवडून देण्याचा निर्धार केला.

यावेळी ज्येष्ठ नागरिकांशी झालेल्या संवादात आबा बागुल यांनी आपल्या आयुष्याचा मोठा काळ समाजासाठी, कुटुंबासाठी आणि शहराच्या जडणघडणीसाठी वाहिलेल्या ज्येष्ठांचा सन्मान राखणे आणि त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे ही आपली जबाबदारी असल्याचे आवर्जून नमूद केले. या संवादादरम्यान ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्य सुविधा, नियमित वैद्यकीय तपासणी, औषधोपचार, विरंगुळ्यासाठी मोकळ्या जागा, सुरक्षित चालण्याचे मार्ग, स्वच्छतागृहे, सार्वजनिक बस थांबे, तसेच प्रशासनाशी संबंधित कामांमध्ये येणाऱ्या अडचणी याबाबत आपली मते मांडली. अनेक ज्येष्ठांनी एकटेपणा, मानसिक तणाव आणि संवादाच्या अभावाकडेही लक्ष वेधले.

यावर आबा बागुल म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक म्हणजे समाजाचा अनुभवसंपन्न आधारस्तंभ आहेत. त्यांच्या समस्या केवळ ऐकून घेऊन चालणार नाहीत, तर त्या तातडीने सोडवण्यासाठी ठोस पावले उचलली जातील. ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र हेल्पडेस्क, नियमित आरोग्य शिबिरे, ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्र तसेच आवश्यक त्या ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.तसेच, ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात सुलभता आणण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना प्राधान्याने राबवण्यात येतील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. समाजाचा विकास हा सर्व घटकांना सोबत घेऊनच होतो. ज्येष्ठ नागरिक सुखी, सुरक्षित आणि सन्मानाने जगतील, यासाठी मी कटिबद्ध आहे, असे आबा बागुल यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून, त्यांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ मिळाल्याने अनेकांनी आबा बागुल यांचे आभार मानले.

## काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालयाचा उल्लेखनीय यश




**डावजे डोंगर -विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

श्रीक्षेत्र स्वयंभू निळकंठेश्वर देवस्थान, डावजे डोंगर पुणे यांच्या वतीने आयोजित सांस्कृतिक व शैक्षणिक महोत्सव २०२५–२०२६ अंतर्गत पार पडलेल्या शालेय लोकनृत्य स्पर्धेत काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, मालखेडच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत लहान गट मुलींनी तृतीय क्रमांक, तर मोठा गट मुलींनी चतुर्थ क्रमांक पटकावला. विजेत्या संघांना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड यांच्या अध्यक्षा श्रीमती आनंदी काकी जगताप, संस्थेचे सचिव मा. आमदार श्री. संजय जगताप साहेब, विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. बारवकर सर, तसेच श्री. भगत सर, श्री. जोरी सर, श्री. गवळी सर, श्री. वळवी सर, श्रीमती गोलांडे मॅडम, शिक्षकेतर कर्मचारी श्री. खोमणे सर व श्री. सचिन जोरी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

या स्पर्धेसाठी विद्यार्थिनींना विद्यालयातील सहशिक्षिका व सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती भालेराव मॅडम, श्रीमती राऊत मॅडम तसेच शिक्षकेत्तर सेविका श्रीमती रजनी भालेराव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.


या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## प्रचारफेरी, सभा, मिरवणूक परवानगीसाठी एक खिडकी परवानगी कक्ष

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी उभे असलेले उमेदवार प्रचारफेरी, सभा, मिरवणूक याद्वारे प्रचार करणार आहेत. त्यासाठी बोर्ड बॅनर, फ्लेक्स, प्रचार वाहने प्रचारफेरी, सभा आणि मिरवणुकीसाठी पालिकेकडून निवडणूक कक्षाची परवानगी घेणे आवश्यक आहे. या एक खिडकी परवानगी कक्षाचे उद्‍घाटन आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते झाले. या ऑनलाइन प्रणालीद्वारे प्रचारफेरी आणि सभा मिरवणूक, तसेच विविध परवानगी प्रमाणपत्र देण्याची यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त प्रसाद काटकर, रवी पवार, राहुल जगताप आदी उपस्थित होते. पुणे महापालिकेने प्रथमच ही ऑनलाइन यंत्रणा सुरू केली आहे. https://electionpermits.pmc.gov.in/ या ऑनलाइन प्रणालीद्वारे पालिकेच्या एकूण १५ क्षेत्रीय कार्यालयात जोडण्यात आले आहेत. उमेदवाराने मागणी केलेल्या परवानगीनुसार आवश्यक फी शुल्क भरणे आवश्यक आहे.




# एमआयटी एडीटी विद्यापीठाला 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार

## शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल प्रा. डॉ. सुनिता कराड यांनी स्विकारला सन्मान




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डिफेन्स फोर्स लीग (डीएफएल) आणि डीआयएफटी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'आपल्या सैन्याला समजावून घ्या' या संकल्पनेवर आधारित आणि 'वॉल ऑफ हिरोज' या जागतिक विक्रमी मोहिमेच्या अधिकृत शुभारंभासाठी आयोजित राष्ट्रीय स्तरावरील 'डिव्हाईन एव्हिएशन एज्युकेशन अँड कल्चर समिट' मध्ये शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय व दूरदृष्टीपूर्ण योगदानाबद्दल एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठ, पुणेला डीएफएलचा प्रतिष्ठेचा 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान विद्यापीठाच्या विश्वस्त व कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड यांनी स्वीकारला.

या राष्ट्रीय परिषदेत माजी हवाई दल उपप्रमुख एअर मार्शल भूषण गोखले (पीव्हीएसएम, एव्हीएसएम, व्हीएम) यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अरुणाचल प्रदेश व मिझोरामचे सन्माननीय राज्यपाल तसेच इंडियन एअरलाइन्सचे माजी अध्यक्ष एअर मार्शल शशीकुमार रामदास (पीव्हीएसएम, एव्हीएसएम, व्हीएम, व्हीएसएम) यांचे विशेष मार्गदर्शन या कार्यक्रमात उपस्थितांना लाभले.

या प्रसंगी नागरी विमान वाहतूक उपमहासंचालिका श्रीमती सुवरिता सक्सेना, मिग–२१ विमानावर सर्वाधिक उड्डाण तासांचा जागतिक विक्रम करणारे एअर कमोडोर सुरेंद्र त्यागी (वायुसेना पदक), तसेच भारताचे पहिले पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेते व पद्मश्री सन्मानित मुरलीकांत पेटकर हे मान्यवर उपस्थित होते. संरक्षण, शिक्षण, विज्ञान आणि संशोधन क्षेत्रातील अनेक नामवंत तज्ज्ञांनी परिषदेत सहभाग नोंदवला.

एमआयटी एडीटी विद्यापीठाने उच्च शिक्षणात नवोन्मेष, कौशल्याधारित अभ्यासक्रम, संशोधन व उद्योगस्नेही उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर केलेल्या योगदानाची दखल घेत डीएफएलतर्फे हा विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.

शिक्षणातून राष्ट्र उभारणीचा विचार प्रत्यक्ष कृतीतुन साकार करण्याची विद्यापीठाची भूमिका प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

परिषदेस प्रारंभी १९७१ च्या युद्धातील शहीदांसह भारतीय सशस्त्र दलातील वीर जवानांना पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी एअर मार्शल भूषण गोखले यांना एनसीसी कॅडेट्सकडून विशेष गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. याच मंचावर डीएफएल आणि डीआयएफटी फाऊंडेशनतर्फे भारतीय सैनिकांच्या शौर्यगाथांना समर्पित 'वॉल ऑफ हिरोज' ही महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय मोहीम अधिकृतपणे जाहीर करण्यात आली.

विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.विश्वनाथ दा.कराड आणि कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या नेतृत्वात एमआयटी एडीटी विद्यापीठाला मिळालेला 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार हा विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था, सामाजिक बांधिलकी आणि देशहितासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा गौरव असल्याची भावना यावेळी उपस्थितांमध्ये व्यक्त झाली.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.